**नियमित दिवाणी दावा क्र. २३९/२०१८**

**निशाणी क्र. ५५ लगत**

**वादीचा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. जी. सी. कदम यांचेमार्फत शपथेवर सुरु–**

माझे सरतपासातील मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला यादी नि. ६५ वरील दस्तऐवज क्र.१ मौजे पवारवाडी येथील गट क्र.११२ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. त्यास **नि. ७३** देण्यात येते. आता मला यादी नि. ६७ लगत फलटण ग्रामीण पोलीस स्टेशन येथील प्रथम खबरी अहवाल क्र. १२९/२०२० ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि. ७४** देण्यात येते, दि. १७.११.२०२४ रोजीचे अदखलपात्र तक्रार क्र. १३११/२०२४ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.७५** देण्यात येते, मौजे पवारवाडी येथील गट क्र.११२ चा ७/१२ उतारा दाखविण्यात आला. त्यास **नि.७६** देण्यात येते, फेरफार क्र.२२८९ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.७७** देण्यात येते, मौजे मळद येथील फेरफार क्र.८५५८ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.७८** देण्यात येते, मौजे मळद येथील गट नं. २९०/१ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.७९** देण्यात येते, मौजे मळद येथील गट नं. २९०/२ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८०** देण्यात येते. मौजे मळद येथील फेरफार क्र. ९८९३ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८१** देण्यात येते, फेरफार क्र. ९७९५ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८२** देण्यात येते, फेरफार क्र.९८१५ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८३** देण्यात येते, फेरफार क्र.९३५७ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८४** देण्यात येते. आता मला यादी नि.५८ वरील जिल्हा न्यायालय सातारा येथील दि.कि.अपिल क्र. ४४/२०१९ ची प्रत दाखविण्यात आली. त्यास **नि.८५** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**वादीचा उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे विधीज्ञ श्री. एन. एम. यादव यांचेमार्फत सुरु–**

२. दावा मिळकतीचा जुना सर्वे नंबर मला सांगता येणार नाही. दावा मिळकतीसंदर्भात गट योजना कधी झाली हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही विडलोपार्जीत मिळकत आहे. मी दावा मिळकतीसंदर्भात जुना ७/१२ उताऱ्यावरील मजकुर पाहिला आहे. कृष्णा केंजळे याना मल्हारी, नामदेव व चंदर असे तीन मुले होती. हे म्हणणे खरे आह की, फेरफार क्र. ३८०९ यातील नोंदी बरोबर आहेत. दावा मिळकतीचा जुने सर्वे क्र. १९८/४ हा होता याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, फेरफार क्र. ३८०९ नुसार सर्वे क्र. १९८/४ यामध्ये मलहारी, नामदेव व चंदर यांना प्रत्येकी ५ आणे हिस्सा नोंदला गेला. दावा दाखल करतेवळी दावा मिळकतीस पोपट मल्हारी कदम, वादी क्र.१ व प्रतिवादी क्र.१ यांची नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यानुसार लागलेल्या नोंदीविरुध्द मी आव्हानित केले नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीस ५ आणे ४ पैसे हिस्स्याची नोंद आजरोजी आबादित आहे. हे म्हणणे खरे आहे की, मल्हारी कदम यांचा मुलगा ५ आणे ४ पैसे या हिस्स्यात वहिवाट करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या नावे असलेल्या ५ आणे ४ पैसे हिस्सा मी वहिवाटतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ हे त्यांच्या नावे असलेल्या ५ आणे ४ पैसे हिस्सा वहिवाटतात. प्रतिवादी क्र.१ यांची हिस्स्याबाबत नोंद ही वाटपपत्राने कमी झाली. प्रतिवादी क्र.१ यांची हिस्स्याबाबत हक्क नोंदणी झाली नाही. प्रतिवादी क्र.१ यांच्या हिस्स्यासंदर्भातील नोंद ही कमी व्हावी म्हणून मी प्रयत्न केले नाही.

३. मल्हारी कदम यांच्या हिस्स्याच्या चतुःसीमा मला सांगता येतील. पूर्वेस शेडगे यांची मिळकत, पश्चिमेस किशोर कदम वादी क्र.१ यांचे क्षेत्र, उत्तरेस जगन्नाथ जाधव यांचे क्षेत्र, दक्षिणेस विजय मोहिते यांचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. ३८०९ ही नोंद आपसात वाटपाने झाली. माझ्या नावे असलेले ५ आणे ४ पैसे क्षेत्राचे चतुःसीमा मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ यांचे नावे दावा मिळकतीसंदर्भात असलेले ५ आणे ४ पैसे क्षेत्राच्या चतुःसीमा मला सांगता येणार नाही. माझ्या नावे असलेल्या क्षेत्राच्या चतुःसीमा दाव्यात न नमुद करण्याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. दि. १५.०६.२०१६ रोजीचे मुळ वाटपपत्र मी दाखल केले नाही. वाटपपत्राबाबत दुय्यम पुरावा दाखल करण्यासाठी मी न्यायालयाची परवानगी घेतली नाही. मी दि. १५.०६.२०१६ रोजीचे वाटपपत्र वाचले आहे. वाटपपत्रात मोबदला झाला हे मला सांगता येणार नाही. वाटपपत्र हे बारामती येथे नोंदविण्यात आले होते. फलटण, जिल्हा सातारा येथील मिळकतीसंदर्भातील वाटणीपत्र नोंदणी हे बारामती येथील दुय्यम निबंधक कार्यालयास करता येत नाही याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यास ९६ आर असा वसला पडलेला नाही. दावा मिळकतीतील ४८ आर क्षेत्राची नोंद ही वादी क्र.२ च्या नावे करण्याचे ठरविण्यासंदर्भात माझ्याकडे तोंडी पुराव्याव्यतिरिक्त दुसरा पुरावा याबाबत मला सांगता येणार नाही. दावा कलम ३ नुसार मौजे पवारवाडी येथील गट क्र.११२ मधील ४८ आर क्षेत्र हे वादी क्र.२ यांच्या नावे करण्याचे ठरले हा मजकुर मी वाटपपत्रानुसार नमुद केले आहे.

**(साक्षीदार यास रक्तदाबाचा त्रास होत असल्यामुळे वादीच्या विधीज्ञांच्या नि.८६ च्या अर्जानुसार उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

श्रवणोत्तर स्विकृती

SD/-

**फलटण** **(पी. एच. पाटील)**

**दिनांक – ०८.०१.२०२५** **४ थे सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण**